# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): अमरावती शहर **P.S.**(ठाणे): कोतवाली

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0359 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):25/09/2025 22:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From** (दिनांक पासून): 25/09/2025
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 25/09/2025
   **Time From** (वेळेपासून): 12:15 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 12:23 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 25/09/2025 **Time** (वेळ): 22:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 044

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/09/2025 22:15 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालि, रेल्वे स्टेशन रोड अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

10 Total (कोर्ट

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलिमा शालीग्राम सातव
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती,कोतवाली,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती,कोतवाली,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8669000360

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश गुलाबराव सानप | | | 1. मुदलीयार नगर, मोती नगर जवळ ,अमरावती,फ्रेजरपूरा, अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्विकारलेली लाच 1000/ रु | 1,000.00 |



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कायमी अप क्र. - 359/25 कलम7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988
फिर्यादी -सरतर्फे:- श्रीमती.निलिमा शालीग्राम सातव, वय-38 वर्ष, व्यवसाय -नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती. मो-8669000360.
आरोपी - लोकसेवक श्री.राजेश गुलाबराव सानप, वय 44 वर्ष ,पद -कनिष्ट लिपीक, नियोजन विभाग, जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती, रा.मुदलीयार नगर, मोती नगर जवळ. अमरावती.
घटनास्थळ – जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय रेल्वे स्टेशन रोड अमरावती.
घ.ता.वेळ - दि. 25/09/2025 चे चे 12.15 वा ते 12.23 वा दरम्यान
दा.ता.वेळ - दि. 25/09/2025 चे 22.15 वा
मागणी केलेली लाच रक्कम – 4000/- रु
स्विकारलेली लाच – 1000/- रु

..............................................................................................................................................................
..................

फिर्याद.दि.25/09/202सरतर्फे:- श्रीमती.निलिमा शालीग्राम सातव, वय-38 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती. मो-8669000360.
मी आज रोजी समक्ष ला.प्र.वि कार्यालय अमरावती येथे सरतर्फे फिर्याद देते की, मी वरील प्रमाणे ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दि.24/09/2025 रोजी मी ला.प्र.वि. अमरावती येथे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. सुधीर कृष्णराव चर्जन, वय-44, व्यवसाय-नोकरी,पद- पो.हे.का. ब.नं.642,नेमणुक- पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती शहर, रा. राम नगर, विनय विला समोर, शेगाव-रहाटगाव रोड,अमरावती यांनी तोंडी तक्रार सांगीतली की,तक्रारदार यांच्या मुलाचे सन 2024 मधे शाळेत खेळता खेळता पडल्याने त्याचा हात मोडला होता. तेव्हा त्यांच्या हाताचे रिम्स हॉस्पीटल येथे ऑपरेशन झाले होते..त्यानंतर एप्रील 2025 मध्ये तक्रारदार यांना अन्ननलीकेचा त्रास होत असल्याने त्यांचे नागपुर येथील मिडास हॉस्पीटल खापरी येथे अन्ननलीकेचे ऑपरेशन झाले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे 1,66,841/- रु. चे व त्यांच्या मुलाचे 48,377/-रु. चे असे दोन्ही मेडीकल बिल तयार करून पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर येथे सादर केले होते. त्यावर त्यांना पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथुन दिनांक 22/07/2025 रोजी पत्र प्राप्त झाले होते. त्यात तक्रारदार यांचे बिल मा.जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, अमरावती येथे सादर केले बाबत नमुद होते. व त्यांची एक प्रत तक्रारदार यांना मिळाली होती.त्यानंतर तक्रारदार हे अंदाजे पंधरा दिवसांनी सामान्य रूग्णालय, अमरावती येथे गेलेअसता वैदयकीय बिलाचे काम पाहणारे लिपीक श्री.सानप यांना भेटले व त्यांच्या दोन्ही बिलाबाबत विचारपुस केली असता श्री. सानप यांनी "जिल्हा शल्य चिकित्सक साहेबांची सही घेवुन बिल परत मा.पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे पाठवितो. त्याकरीता तुमच्या बिलाच्या दोन टक्के रक्कम म्हणजे अंदाजे 4,000/- रु. दयावे लागतील. नाहीतर मी हे काम करणार नाही" असे म्हटले. त्यामुळे तक्रारदार यांनी नाईलाजास्तव बघतो असे म्हणून तिथून निघून आले. त्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे जावुन तक्रारदार यांनी त्यांच्या बिला बददल विचारपुस केली असता बिल सामान्य रूग्णालय, अमरावती येथुन मंजुर होवुन आले नव्हते. तेव्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथील श्री.सानप हे तक्रारदार यांचे दोन्ही मेडीकल बिलाचे दोन टक्के प्रमाणे अंदाजे 4,000/-रू. लाच रक्कम घेतल्या शिवाय त्यांचे बिल मा.पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे पाठविणार नाही यांची तक्रारदार यांना खात्री झाली होती. त्यामुळे तक्रारदाराला श्री. सानप यांना 4,000/- रु. लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही करीता तक्रारदार हे तक्रार देण्याकरीता आले होते.त्यावरून आम्ही तत्काळ विभागीय



Scanned with OKEN Scanner

माहीती कार्यालय, अमरावती यांना पत्र देवुन 1)श्री. सुनिल अंबादास काळे, वरिष्ट लिपीक 2)श्री. स्वप्नील नागेशराव महल्ले, वाहन चालक. असे दोन सरकारी पंच बोलविले सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हा व पंचासमक्ष वरीलप्रमाने हकीकत पुन्हा सांगीतली व कागदावर लिहुन तषी लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री.महल्ले यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली व त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करुनपडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला व लागलीच पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.महल्ले यांचेसह कनिष्ट लिपीक श्री. राजेश सानप यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले. त्यावेळी श्री. राजेश सानप हे त्यांच्या कार्यालयात हजर नसल्याने तक्रारदार व त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर पुन्हा काही वेळाने पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.महल्ले यांचेसह कनिष्ट लिपीक श्री. राजेश सानप यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले. थोडयाच वेळात ते परत आले.त्यानंतर आम्ही तक्रारदार व श्री. सानप यांच्यातील संभाषणाची क्लिप ऐकली असता त्यात तक्रारदार व श्री.सानप यांच्यात बिलाबाबत बोलनी झाल्याचे दिसुन येत आहे त्यानंतर श्री.सानप यांनी तक्रारदार यांना त्यांच्या मेडिकल बिलाच्या दोन्ही फाईल दिल्या व म्हटले की," याचे दया लागल ना"त्यावर तक्रारदार बोलले की,"याचे किती" त्यावर श्री.सानप बोलले की,"ते एक लाख काही रूप्याच आहे...आमच्या हिशोबान तर लय होते... तुमच्या हिशोबान दया...आमच तर दोन परसेंट असते..."त्यावर तक्रारदार बोलले की,"दोन परसेंट असते मग किती होतात याचे"त्यावर श्री.सानप बोलले की,"एक हजार रूपये देवुन दया ना काय जावु दया..."त्यावर तक्रारदार बोलले की,"एक हजार रूपये"त्यावर श्री.सानप बोलले की "तसे तर लय दोन हजार रूपये होते". त्यानंतर " बर येतो मी"असे बोलुन तक्रारदार हे पंचासोबत तेथुन निघुन परत आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.राजेश सानप यांनी लाच रक्कम मागीतल्याचे निश्पन्न झाले.त्यानंतर पडताडणी पंचनामा करण्यात आला. तसेच श्री. सानप हे सहा वाजेपर्यंत कार्यालयात राहतील परंतु पडताडणी कार्यवाहीलाच वेळ झाल्याने रात्री श्री. सानप यांची कार्यालयात भेट होणार नाही असे तक्रारदार यांनी सांगीतले. त्यावरून कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानपयांचे विरूध्द सापळा कार्यवाही दि. 25/09/2025 रोजी आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर आम्ही दि.25/09/2025 रोजी कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानपयांचेवर सापळा कारवाई करायची असल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम 1,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता त्यांनी1,000/-रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 2 नोटाहजर केल्या.त्या नोटांचे क्रमांक आम्हीपंच क्र.1 श्री.महल्लेयांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री. काळे यांना को-या कागदावर क्रमांक लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व आम्ही सहया केल्या.

त्यांनतर आमच्या सुचनेवरुन स्टाफ आशिष जांभोळे यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाला अँन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच तक्रारदार व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सापळा पंचनाम्यादरम्यान हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम तक्रारदार यांच्या शर्ट च्या समोरील डाव्याबाजुच्या खिशा मध्ये ठेवुन दिली. व पोकॉ.शैलेश कडू यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रासदार व पंच क्र.1 श्री.महल्लेयांना तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनानेकनिश्ठ लिपीक श्री.राजेश सानपयांची भेट घेण्याकरीता जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती येथे रवाना केले. त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे वेगवेगळ्या वाहनाने जिल्हा सल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती कार्यालयाच्याआजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा तक्रारदार व पंच क्र.1 श्री.महल्लेषल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती कार्यालयात कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानप यांच्या रूममधे गेले व काही वेळातच रूमच्या बाहेर येवुन सापळा पथकास लाच स्विकारल्याबाबत पुर्व नियोजित इशारा केला.त्यावेळी आम्ही सर्वजण जावुन कनिश्ठ लिपीक श्री.राजेश सानप यांना ताब्यात घेतले. त्यावेळी आम्ही श्री. सानप यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचा परिचय करून दिला. तेव्हा पो शि शैलेश कडु यांनी तक्रारदार जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर आम्ही कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानप यांना त्यांचे नाव,पद,व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.राजेश गुलाबराव सानप, वय 44 वर्शे, पद -कनिष्ट लिपीक, नियोजन विभाग,जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती, रा.मुदलीयार नगर, मोती नगर जवळ. अमरावती असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदारा कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानप यांनी त्यांचे शर्टचे डावीकडील खिष्यामध्ये ठेवलेली होती ती लाच रक्कम आमच्या सुचनेवरूनपंच क्र.1 श्री. महल्ले यांनी कनिष्ट लिपीक श्री.राजेश सानप यांचेकडुन ताब्यात घेतली. त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा केला. तरी,शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती येथील कनिश्ठ लिपीक श्री.राजेश गुलाबराव सानप यांनी दि.



Scanned with OKEN Scanner

24/09/2025 चे पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री. सुधीर कृष्णराव चर्जन यांचे आजाराचे वैदयकीय बिल मंजूर करून देण्यासाठी तडजोडी अंती 1,000/-रू लाचेची मागणी करून रक्कम स्विकारन्याचे मान्य केले व दि.25/09/2025 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे आजाराचे वैदयकीय बिल मंजूर करण्यासाठी म्हणून 1,000/- रुपये लाचेची रक्कम वेळ अंदाजे 12.15 वा. ते 12.23 वा.च्या दरम्यान शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती येथील रूम क्र.6 मध्येस्विकारल्याने श्री.राजेश गुलाबराव सानप, वय 44 वर्षे, पद -कनिष्ट लिपीक, नियोजन विभाग, जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय, अमरावती, रा.मुदलीयार नगर, मोती नगर जवळ, अमरावतीयांचे विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.
अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Shashikant Subhash Chiple
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402SSC
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**
26/9/25

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

Police Sub-Inspector
Police Station City Kotwali
Amravati City

**Name (नाव):** Manohar Naktuji Kot
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN60115



Scanned with OKEN Scanner